दाखल दिनांक : २९/०९/२०२५

नोंदणी दिनांक : २९/०९/२०२५

निकाल दिनांक : ३०/०७/२०२६

| कालावधी | : वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ०० | १० | ०१ |

**निशाणी क्रमांक : ४५**

| | | | |
|---|---|---|---|
| | **अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे न्यायालय**<br>(पिठासीन अधिकारी एम. एस. सहस्त्रबुध्दे)<br>(न्यायनिर्णय दिनांक ३०/०७/२०२६ रोजी पारीत)<br>**विशेष अत्याचार प्रतिबंधक सत्र खटला क्रं.१०५/२०२५**<br>**CNR No. MHWS010009192025** | | |
| | गुन्हा क्रमांक ५५७/२०२५<br>पोलीस स्टेशन रिसोड | | |
| **फिर्यादी/ अभियोग पक्ष** | : | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन रिसोड | |
| **प्रतिनिधित्व** | : | श्रीमती एस. पी. कुळकर्णी सहायक सरकारी वकील, सरकार तर्फे. | |
| **आरोपी** | | १.माणिक किसनराव खरात<br>वय ५४ वर्षे, कामधंदा - शेती<br>२. प्रवेश किसनराव खरात<br>वय ४९ वर्षे, कामधंदा - शेती<br>३.निलेश माणिक खरात<br>वय ३० वर्षे, कामधंदा - शिक्षण<br>४. विशाल उर्फ गुड्डू माणिक खरात<br>वय २६ वर्षे, कामधंदा - शिक्षण<br>सर्व रा.पळसखेडा, ता.रिसोड, वाशिम | |
| **प्रतिनिधित्व** | : | विधीज्ञ श्री. एम.पी.जाधव आरोपी तर्फे | |

## भाग – ब

| | |
|---|---|
| घटना दिनांक | २०/०७/२०२५ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल तारीख | २१/०७/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २९/०९/२०२५ |
| दोषारोपणाची तारीख | ०९/१२/२०१५ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | ०५/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ३०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३०/०७/२०२६ |
| शिक्षा, काही असेल तर, देण्याची तारीख | -- |

## आरोपीचा तपशील

| आ. क्रं. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवण्यात आलेले कलम | निर्दोष सुटका झाली कि दोषी ठरविले | शिक्षा कोणती दिली | फौ.प्र.सं.चे कलम ४२८ प्रमाणे शिक्षेत सुट देण्याकरीता खटला दरम्यान कारागृहात असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | माणिक किसनराव खरात | २२/०७/२५ | ०८/१०/२५ | भारतीय दंड संहितेचे कलम २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये. | निर्दोष सुटका झाली | निरंक | लागु नाही |
| २ | प्रवेश किसनराव खरात | २२/०७/२५ | ०८/१०/२५ | भारतीय दंड संहितेचे कलम २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये. | निर्दोष सुटका झाली | निरंक | लागु नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | निलेश माणिक खरात | २२/०७/२५ | ०८/१०/२५ | भारतीय दंड संहितेचे कलम २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये. | निर्दोष सुटका झाली | निरंक | लागु नाही |
| ४ | विशाल उर्फ गुड्डू माणिक खरात | २२/०७/२५ | ०८/१०/२५ | भारतीय दंड संहितेचे कलम २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये. | निर्दोष सुटका झाली | निरंक | लागु नाही |

## भाग – क

**अ. सरकारी साक्षीदार** :

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्रं.१ | रंजना रतन शिरसाठ | फिर्यादी |
| सा.क्रं.२ | महादेव बापुसिंग चव्हाण | तपास अधिकारी |

अभियोग पक्षाने खालील दस्तऐवज सिध्द केले.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.३१/सा.क्र.१ | प्रथम खबरी अहवाल |
| २ | नि.क्र.३२/सा.क्र.१ | बयाण |
| ३ | नि.क्र.३९/सा.क्र.२ | तक्रार |

**ब. बचावाचे साक्षीदार** :

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाचे निशाणी** :

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.३४/आरोपीतर्फे मान्य | घटनास्थळ पंचनामा |

**ड. भौतिक वस्तु** :

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**न्यायनिर्णय**

*(दिनांक 30 जुलै २०२६ रोजी पारीत)*

प्रस्तूत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये दोषारोपण करण्यात आलेले आहे.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की –

फिर्यादी ही दिनांक २०/०७/२०२५ रोजी तिची जाउ लक्ष्मी शिरसाट हिचे सोबत पळसखेडा येथील कबाडी या शेतात पिकाचे निंदन करीत असताना दुपारी ४ वाजताचे दरम्यान आरोपी माणिकराव हा त्यांच्या शेताजवळ आला व शेताचे धु–या वरुन

त्याने फिर्यादी व तिचे जाउला जातीवरुन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. फिर्यादी व तिची जाउ यांनी आरोपीला काही उत्तर दिले नाही व त्या घरी आल्या. घरी आल्यानंतर फिर्यादीने याबाबत तिचे पतीला सांगितले व त्याने आरोपी माणिकराव याला मोबाइलवरुन याबाबत विचारणा केली. त्यानंतर आरोपी माणिकराव संध्याकाळी ७ वाजता इतर आरोपींसोबत फिर्यादीचे घरात आले व आरोपी प्रवेश याने फिर्यादीचा भाया सदानंद याला घरातून बाहेर ओढले व रस्त्यावर पाडले. आरोपी निखेलेश व विशाल यांनी त्याला थापडबुक्यांनी मारहाण केली व आरोपी माणिकराव यांनी त्यांना गावात कसे राहता हे पाहतो असे धमकावून त्यांचे घरावर पेटोल टाकून जाळून टाकण्याची धमकी दिली. त्यावेळेस सर्व आरोपींनी त्यांना जातीवरुन शिवीगाळ केली. त्यामुळे सदर घटनेची फिर्याद फिर्यादीने पोलिस स्टेशन रिसोड येथे दिली.

३. फिर्यादीच्या तक्रारवरुन दाखल झालेल्या गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी नवदिप अग्रवाल यांनी केला. तपास अधिकारी यांनी तपासा दरम्यान फिर्यादी व इतर साक्षीदारांचे जवाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, फिर्यादी हिचे जात प्रमाणपत्र् व इतर कागदपत्र् गोळा केले. त्यानंतर त्यांनी आरोपींना अटक करुन अटकपंचनामा तयार केला. फिर्यादीचे जात प्रमाणपत्र् पडताळणीबाबत त्यांनी उपविभागीय दंडाधिकारी यांना पत्र् दिले व गुन्हयाची माहिती समाजकल्याण कार्यालय यांना दिली. तपासाअंती आरोपी विरुध्द भरपुर पुरावा मिळून आल्याने आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र् सादर केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपीच्या विरोधात भारतीय दंड संहितेचे २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये या अपराधाबाबतचे आरोप नि.क्र.२१ निश्चित केले व सदरचे आरोप, आरोपीला वाचून व समजावून सांगण्यात आले. मात्र, आरोपीने ते कबूल केले नसल्याने सदरचा खटला चालविण्यात आला. आरोपीचे निवेदन नि.क्र.२२ ते २५ वर नोंदविण्यात आले.

५. सदरहू प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने **भाग – क** प्रमाणे नमुद एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. या व्यतिरीक्त अभियोग पक्षाने आरोपीविरुध दोषारोप सिध्द करण्याकरीता **भाग – क** प्रमाणे नमुद कागदपत्रंवर भिस्त ठेवली.

६. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये अनुक्रमे नि.क्रं.४१ ते ४४ प्रमाणे बयान नोंदविण्यात आले. आरोपीने बचाव घेतला आहे की, त्यांना खोटया प्रकरणात गोवण्यात आले आहे. आरोपीने त्याच्या बचावाकरीता कोणताही साक्ष पुरावा दिला नाही.

७. सहायक सरकारी वकील श्रीमती एस. पी. कुळकर्णी व आरोपीचे वकील श्री. एम.पी.जाधव यांचा युक्तिवाद ऐकला. सरकारी पक्षाचा खटला, आरोपीचा बचाव व प्रकरणात दाखल असलेल्या कागदपत्रांवरुन खालील मुद्दे विचारार्थ घेण्यात आले. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसासहीत खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि.२०/०७/२०२५ रोजी आरोपींनी संगनमत करुन सदानंद शिरसाट यांना इच्छापुर्वक दुखापत केली ? | नाही. |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने संगनमत करुन फिर्यादी व तिचे परिवारातील सदस्याना सार्वजनिक ठिकाणी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व इशारे केले ? | नाही. |
| ३ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने संगणमत करुन जाणीवपुर्वक फिर्यादी हिचा अर्वाच्य भाषा वापरुन अपमान केला व तिला सार्वजनिक शांतता भंग करण्यास अथवा कुठला गन्हा करण्यास प्रवृत्त केले ? | नाही. |
| ४ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी हे अनुसुचीत जाती व जमातीचा सदस्य नसुन त्याने फिर्यादी व तिचे परिवारातील सदस्य हे अनुसुचीत जातीची सदस्य असल्याचे माहित असुन सुध्दा त्यांच्या संदर्भात भारतीय दंड विधान अंतर्गत गुन्हे केले ? | नाही. |
| ५ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत** :–

८. सर्व मुदृदयांवरील विवेचण एकमेकांशी संलग्न असल्यामुळे, विवेचणाची पुनारावृत्ती टाळण्याकरीता सर्व मुद्दे एकत्रीतरित्या चर्चेकरीता घेतले आहेत.

९. अभियोग पक्षाने तपासलेला साक्षीदार क्र.१ ही फिर्यादी असून तिने तिचे सरतपासात सांगीतले की, घटना मागचे वर्षी घडली. त्या दिवशी ती तिचे ननंद लक्ष्मी शिरसाट हिचेसोबत त्यांचे शेतातून गहू काढत होती. आरोपी माणिक खरात याचे शेत त्यांचे शेताला लागून आहे. आरोपी माणिक खरात व काही लोक त्याचे शेतात काम करत होते त्यावेळेस आरोपी माणिक खरातने धु–यावरुन एक दगड उचलल्यामुळे त्यांच्यामध्ये बाचाबाची झाली या व्यतिरिक्त काही घडले नाही. सदर साक्षीदाराने आरोपींनी तिला अथवा तिचे परिवारातील सदस्याला जातिवरुन अर्वाच्य भाषेत शिवागाळ केली असलयाचे अथवा मारहाण केले असल्याचे नाकारले आहे. या साक्षीदाराचा उलटतपास अभियोगपक्षातर्फे नोदविण्यात आला. परंतु कुठलीही महत्वाची कबूली अभिलेखावर आली नाही.

१०. या साक्षीदारा व्यतिरिक्त अभियोगपक्षाने हेड कॉन्स्टेबल माधव चव्हाण साक्षीदार क्र.२ यांची साक्ष नोंदविली. या साक्षीदाराने त्याने पिडीतेची तक्रार तिचे सांगण्यानुसार नोंदविली असल्याचे सांगितले आहे. असे असले तरीही पिडीतेने तक्रारीतील मजकूर सत्य नसल्याचे सांगितल्यामुळे केवळ या साक्षीदाराच्या पुराव्यावरुन आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द झाले असे म्हणता येणार नाही.

११. या साक्षीदारां व्यतिरीक्त अभियोग पक्षातर्फे घटनेसंदर्भात कुठलाही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. वर उल्लेख केल्याप्रमाणे फिर्यादीने अभियोग पक्षची साथ् दिलेली नाही. घटनेसंदर्भात इतर साक्षीदार अभियोगपक्षातर्फे बोलविण्यात आले होते परंतु ते कोणीही अभियोगपक्षास मदत करत नसल्यामुळे, सरकारी वकिलांनी पुरसिस नि.३३ देवून त्यांची साक्ष नोंदवायची नसल्याचे कळविले आहे.

१२. तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपीने गुन्हा केला असा स्पष्ट व निविर्वाद पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द लावलेले दोषारोप स्पष्टपणे व निर्वीवादपणे अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही. त्यानुसार आरोपी हा दोषमुक्त होण्यात पात्र् आहेत. सबब मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते. सबब, मुद्दा क्रं.५ करीता मी खालील आदेश पारित करीत आहे –

## आदेश

अ. आरोपी नामे **माणिक किसनराव खरात,** प्रवेश किसनराव खरात**,** निलेश माणिक खरात**, विशाल उर्फ गुड्डू माणिक खरात** याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम भारतीय दंड संहितेचे २९६, ११५ (२), ३५१(२), (३)(५) व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदयाचे कलम ३ (२) (va) अन्वये दोषमुक्त करण्यात आले आहे.

ब. आरोपीचे जामीनपत्र व जातमुचलका पत्र रद्द करण्यात येत आहे.

क. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(१) अन्वये रुपये २५,०००/–(रुपये पंचवीस हजार फक्त) प्रत्येकी नविन जामीन–पत्र दयावे. सदर जामीनपत्र पुढील सहा महिन्यापर्यंत अंमलात राहिल.

ई. न्यायनिर्णय खुल्या कक्षेत घोषीत करण्यात आला.

MOULASHRI SHIRISH SAHASRABUDHE
Digitally signed by MOULASHRI SHIRISH SAHASRABUDHE
Date: 2026.07.30 20:06:39 +0530

ठिकाणः वाशिम (एम. एस. सहस्त्रबुध्दे)
दिनांक: ३०/०७/२०२६ अति. सत्र न्यायाधीश,वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original order :-

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | R.K.Pawar, Stenographer (Grade-1) |
| Court Name | :- | District Judge-3 & Additional Sessions Judge, Washim |
| Date | :- | 30/07/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 30/07/2026 |
| Order uploaded on | :- | 30/07/2026 |